# प्रेस नोट

## डी.एस.के आर्थिक घोटाळया संबधी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल व इतर सहभागी आरोपी यांना अटक

शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं.३४७/२०१७, भा.दं.वि.कलम-४२०,४०६,४०९,४६७,४६८,४७१,४११,३४,१२०(ब), एम.पी.आय.डी. कायदा कलम ३ व ४ तसेच प्राईज चिट ॲन्ड मनीसर्क्युलेशन (बॅनिंग ) ॲक्ट १९७८ चे कलम ३,४,५,६ तसेच भारतीय रिझर्व्ह बॅंक ॲक्ट १९३४ चे कलम ४५ एस, ४५ आय,ए/५८ अन्वये सदरचा गुन्हा दिपक सखाराम कुलकर्णी, हेमंती दिपक कुलकर्णी, शिरीष दिपक कुलकर्णी व इतरांच्याविरुध्द दि. २८/१०/२०१७ रोजी फिर्यादी श्री जितेंद्र नारायण मुळेकर, वय ६५ वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त, रा.डी-२६,सृष्टी, गुरुगणेशनगर जवळ, कोथरुड, पुणे- ४११०३८ यांच्या तक्रारीवरुन दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्हयातील मुख्य आरोपी दिपक सखाराम कुलकर्णी व हेमंती दिपक कुलकर्णी यांनी आताप्रर्यंत विविध भागीदारी संस्था स्थापन करुन नागरीकांना गुंतवणुकीवर आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखवुन मुदत ठेवी त्यांच्या संस्थेमध्ये ठेवण्यासंबंधी प्रवृत्त करण्यात आले. साधारणपणे सन २०१० पर्यंत डी.एस.के.समुहाने ठेवीदारांकडुन त्यांच्या पार्टनरशीप फर्म व डी.एस.कुलकर्णी डेव्हलपर्स लि. याच्या नावाने प्रती वर्ष १०.५ ते १२.५ टक्के दराने स्विकारलेल्या एफ.डी./अनसिक्युअर्ड लोनवर मुदतीत व्याज व मुदत संपल्यानंतर मुळ ठेवी ठेवीदारांना परत केल्या त्यामुळे नागरीकांचा डी.एस.के. समुहावर विश्वास बसला व मोठ्या संख्येने सेवानिवृत्त / ज्येष्ठ तसेच इतर नागरीक ठेवीमध्ये रक्कम गुंतविण्यास सुरुवात केली. परंतु नंतर ठेविदारांच्या ठेवी, कर्ज त्यांचे व्याज इतर संस्थांचे कर्ज त्याचे व्याज हे त्यांना देता येणे शक्य झाले नाही. म्हणुन त्यातुन बाहेर पडण्यासाठी आणखी कर्ज घेणे व ठेविदारांना पैसे परत न करता गुंतवणुकीची मुदत वाढवुन घेणे असा प्रकार करण्यात आला. त्यापैकीच डी.एस.के.डी.एल. या पब्लिक लि. लिस्टेड कंपनीमधुन अपहार करण्यासाठी पुर्व व सुनियोजित कट रचुन एक व समविचाराने वागुन भागधारकांच्या हक्काच्या नफ्यातील निधीचा त्यांनी अपहार केला आहे.

आत्तापर्यंतच्या झालेल्या तपासात डीएसके उदयोग समुहाकडुन १) ठेवी व कर्ज स्वरुपातील १०८३.७ कोटी रु., २) वित्तीय संस्था / बॅंका यांचेकडुन ७११.३६ कोटी रु. ३) डिबेंन्चर्स (कर्जरोखे) यांच्याद्वारे १११.३५ कोटी आणि ४) फुरसुंगी येथील जमिनीच्या व्यवहारातुन झालेल्या अपहाराद्वारे १३६.७७ कोटी असा एकुण २,०४३.१८ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

दीपक सखाराम कुलकर्णी व त्याची पत्नी हेमंती कुलकर्णी हे दोघेही सध्या न्यायालयीन कोठडीत असुन त्यांच्याविरुद्ध पुरेसा पुरावा मिळाल्याने दिनांक-१७/०५/२०१८ रोजी ३७००० पानांचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे. याच तपासादरम्यान गुन्हयाचे स्वरुप व अपहारीत रक्कम यांचेविषयी अधिक तपास करीत असता अपहाराची रक्कम ही वेगवेगळया व्यक्ती, संस्था यांचेमार्फत वेगवेगळया स्वरुपात वळविण्यात आली आहे असे निदर्शनास आले आहे. त्यांचा तपास करता १. केदार प्रकाश वांजपे, २. सई केदार वांजपे, ३. धनंजय राजाभाऊ पाचपोर यांना दिनांक-१६/०५/२०१८ रोजी आणि ४. विनयकुमार राघवेंद्र बाडगंडी यास दिनांक-१७/०५/२०१८ रोजी अटक करण्यात आलेली आहे. उर्वरीत आरोपींचा तपास पथकाद्वारे शोध घेण्याचे काम चालु आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना मा. न्यायालयासमोर आज रोजी हजर करण्यात येत आहे.

उपरोक्त गुन्हयांचा तपास मा. सह पोलीस आयुक्त, गुन्हे, पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे पुणे शहर यांचे मागदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त,निलेश मोरे (आ.व.सा) हे करित आहेत


पुणे शहर पोलीस